जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष २ रे | अंक २६१ | शनिवार, २६ एप्रिल २०२५ | मूल्य : ५ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210 | DC No - SDM/SR/37/2023

## अखेर हवेली मोजणी कार्यालयाचे उपअधीक्षक अमरसिंह पाटील निलंबित

### पुणे प्राईम न्यूजच्या बातम्यांवर शिक्कामोर्तब

**संदीप बोडके**

पुणे, ता. २५ : हेलीकॉप्टर शॉटसाठी माहिर असलेले हवेलीचे उपअधिक्षक अमरसिंह रामचंद्र पाटील यांना शासनाने निलंबित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उपसचिव आश्विनी यमगर यांनी शुक्रवारी (ता. २५) हवेलीचे उपअधिक्षक अमरसिंह पाटील यांच्या निलंबनाचा आदेश जारी केला आहे.

उपअधीक्षक अमरसिंह पाटील व भूकरमापक किरण येटाळे यांच्यावर हडपसर येथील जमीन मोजणी प्रकरणात येरवडा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून ते फरार झाले आहेत. हवेली मोजणी कार्यालयाबाबत उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, जमाबंदी आयुक्त कार्यालय तसेच महसूलमंत्री यांच्याकडे नागरिकांनी तक्रारी केलेल्या होत्या. यामुळे हवेली मोजणी कार्यालयाची प्रतिमा मलीन झालेली आहे. त्यामुळे शासनाने अमरसिंह पाटील यांना पुढील आदेश होईपर्यंत शासकीय सेवेतून निलंबित केले आहे.

निलंबन काळात पाटील यांचे मुख्यालय कार्यालय हे उपअधिक्षक कार्यालय -लोहारा, जिल्हा धाराशिव असून त्यांनी धाराशिव जिल्हा



अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या पुर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडता कामा नये, असे निलंबन आदेशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

**अमर पाटील यांना हडपसर येथील मोजणी प्रकरण भोवलं..**

हडपसर येथील सर्वे नं. १८१/३, १८१/४अ, १८१/६ व १८१/९/१ या मिळकतीची सन २०२३ व सन २०२४ मध्ये भुमीअभिलेख कार्यालय, हवेली, पुणे यांच्याकडून शासकीय फी अदा करुन कायदेशीर रितसर पद्धतीने मोजणी तक्रारदाराने करुन घेतली होती. मात्र, सदर जागेच्या मोजणीनंतर हद्द निश्चिती करण्यासाठी व तसा मोजणी नकाशा देण्यासाठी हेलिकॉप्टर शॉट लाच मागणी व चुकीच्या मोजणीचे क प्रत प्रकरण उपअधीक्षक पाटील यांच्यावर चांगलेच शेकले आहे. तसेच याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने त्यांना शासनाने निलंबित केले आहे.

# चुकीच्या मोजणीमुळे शेतकऱ्यावर वडिलोपार्जित घर गमावण्याची वेळ

## शासकीय रेकॉर्ड डावलून मोजणी होत असल्याचा शेतकऱ्याचा आरोप

**संदीप बोडके**

पुणे, ता. २५ : मुळशी येथील मोजणी कार्यालयाच्या कारभारामुळे मौजे लवळे राऊतवाडी येथील शेतकऱ्यावर आपले वडिलोपार्जित घर गमावण्याची वेळ आली आहे. कोर्ट कमिशनर यांनी मोजणी झालेली असतानाच तसेच मोजणी कार्यालयाच्या मूळ रेकार्डकडे दुर्लक्ष करून, लगतधारक शेतकरी व मोजणी कार्यालयाच्या संगनमताने गटाची हद्द चुकीची दाखवल्याचा आरोप लवळे येथील शेतकरी अरुण भिकोबा राऊत यांनी केला आहे.

मौजे लवळे राऊतवाडी (ता. मुळशी) येथे गट नंबर, ४१३ मध्ये तक्रारदार अरुण राऊत यांची वडिलोपार्जित शेती आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार त्याच गटात त्यांचे घर आहे. गट नंबर ४१३ व गट नंबर ४३० या गटाचा बांध हा पुर्व




पश्चिम दिशेला सरळ आहे. त्याची नोंद ही शासकीय दफ्तरी नकाशात नमूद आहे. २००६ साली झालेल्या कोर्ट कमिशनर मोजणीतही हद्द व खुणा कायम आहेत. मात्र मोजणी कार्यालय मुळशी हे गट नबंर ४१३ व गट नंबर ४३० चा बांध हा नकाशात सरळ असतानाही तिरकस दाखवत आहे.

मोजणी कार्यालय मुळशीच्या या गलथान कारभारामुळे गट नंबर ४१३ येथे चाळीस वर्षापासूनचे रहाते घर हे शेजारील गट नंबर ४३० मध्ये दाखवत आहे. लगतधारक व मोजणी कार्यालयातील भूकरम ापक व अधिकाऱ्याच्या संगनम तामुळे शासकीय दफ्तर व रेकार्ड डावलून चुकीच्या मोजणीच्या हद्दी खुणा दाखवण्याचे काम मोजणी कार्यालय करत असल्याचा आरोप राऊत यांनी पुणे प्राईम न्यूज शी बोलताना केला आहे. मुळशीतील मोजणी कार्यालयाच्या चुकीच्या कार्यपध्दतीवर शेतकऱ्याने आक्षेप घेत तक्रारी केल्या आहेत. तसेच उपोषणाचा इशारा देऊन उपोषणास सुरुवात केली होती. त्यावेळी मुळशीचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक व मुळशी मोजणी कार्यालयाचे उपअधीक्षक यांनी नव्याने निमताना मोजणी ४५ दिवसांत करण्याचे आश्वासन तक्रारदार शेतकऱ्याला देण्यात आल्याने उपोषण थांबवल्याचे राऊत यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांची मागणी नसताना मोजणी अर्ज दुसऱ्या तालुक्यातील मोजणी कार्यालयाकडे वर्ग**

प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार राऊत यांची कोणतीही मागणी नसताना मुळशीतून भोर येथील मोजणी कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहे. भोर मोजणी कार्यालयाकडून अद्यापही हद्दी खुणा दाखवण्यात आलेल्या नाहीत. केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने हे प्रकरण दुसऱ्या तालुका कार्यालयाकडे वर्ग केले आहे, असे शेतकऱ्याने म्हंटले आहे. कर्मचारी व अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याने भोर मोजणी कार्यालयाकडून न्याय मिळण्याची अपेक्षा राहिली नसल्याचा आरोप शेतकरी अरुण राऊत यांनी केला आहे.

> संबधित प्रकरण आमच्या कार्यालयाकडे वर्ग झालेले आहे. मात्र मौजे लवळे राऊतवाडी येथील प्रस्तुतच्या गटावरील अभिलेख मागवले आहेत. ते प्राप्त झाल्यावर हद्दी खुणा दाखवण्यात येतील.
> - **विकास गोफणे,** उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, भोर

> संबंधित शेतकऱ्याने निमताना मोजणीसाठी अर्ज दाखल केलेला होता. तसेच कार्यालयातील काही भूकरमापकांच्या कामाविषयी शंका संबंधित शेतकऱ्याने घेतली आहे. आणि वरिष्ठ कार्यालयाच्या सूचनेनुसार त्यांचे प्रकरण भोर उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडे वर्ग केले आहे.
> - **स्वप्ना पाटील,** उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, मुळशी

## उरुळी कांचन येथील महादेव कांचन कॉलेजमध्ये पदवी वितरण समारंभ संपन्न

**उरुळी कांचन, ता. २५ :** येथील अजिंक्य चॅरिटेबल फाउंडेशनच्या महादेव कांचन कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च या संस्थेचा पदवी प्रदान समारंभ नुकताच उत्साहात पार पडला. यावेळी २०१९ ते २०२३ या चार वर्षांत पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कॉलेजच्या सेमिनार हॉलम ध्ये प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष महादेव कांचन होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती वंदनेने करण्यात आली. या कार्यक्रमासाठी सेमिनार हॉलमध्ये विशेष सजावट करण्यात आली होती. या समारंभाचे मुख्य अतिथी म्हणून प्रा. रवींद्र भारती



(संस्थापक आणि उचऊ भारती बिझनेस ग्रुप, पुणे), फाउंडेशनचे सचिव डॉ. अजिंक्य कांचन, शिक्रापूर येथील केएसएस कॉलेज ऑफ फार्मसीचे प्रा. डॉ. मृणाल शिरसाठ, कार्यकारी संचालक, डॉ. अप्पासाहेब जगदाळे, प्राचार्य डॉ. नितीन एम. गवई, अस्मिता पतसंस्थेच्या अध्यक्षा प्रतिभा कांचन, कुरकुंभ, एमआयडीसीचे विश्वा लॅबोरेटरीज येथील डॉ. विष्णू हलनोर, अ‍ॅन्जल कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य, डॉ. भागवत चव्हाण, उरुळी कांचन येथील सिद्धिविनायक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. गणेश ताटे, डॉ. मिलिंद थेउरकर, उरुळी कांचन परिसरातील नागरिक, पालक, विद्यार्थी, शिक्षक, व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व त्यांच्या शैक्षणिक प्रवासाबद्दल गौरवोद्गार काढले. विद्यार्थ्यांना औपचारिकरीत्या पदव्या प्रदान करण्यात आल्या. अनेक पालकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनीही आपल्या आठवणी, संघर्ष आणि शिक्षण प्रवासाबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. नितीन गवई, प्राचार्य कुणाल हाके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी समूह छायाचित्रे काढून समारंभाची सांगता झाली. समारंभानंतर सर्व उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा केंद्र आणि रेण्वीय निदान प्रयोगशाळा सुरु करण्याची आरोग्यमंत्र्यांची घोषणा

**पुणे, ता. २५ :** सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने रुग्णालयांमध्ये स्वच्छता, आहार आणि रुग्णालयात वापरल्या जाणाऱ्या वस्त्रांची स्वच्छता हे अत्यंत महत्त्वाचे विषय आहेत. त्यामुळे राज्यातील ८ परिमंडळातील ५९३ आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा केंद्र लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे राज्यामध्ये साथरोग उद्रेक काळात जीवाणू व विषाणू चाचणी जलद गतीने करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे रेण्वीय निदान प्रयोगशाळा उभारणार असल्याची घोषणा आरोग्य मंत्री आबिटकर यांनी केली.

कुटुंब कल्याण भवन येथे आयोजित राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्र इमारत भूमिपूजन आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब




ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत राज्यातील नवीन ४३ आपला दवाखान्यांच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याचे आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे व्यवस्थापकीय संचालक अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, आरोग्य सेवा पुरविण्यासाठी पुणे हे राज्यातील दुसरे सर्वात महत्त्वाचे ठिकाण आहे. पुण्यात आरोग्य विभागाची अनेक राज्यस्तरीय कार्यालये आहेत. राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीमुळे आरोग्य विभागाची एकाच छताखाली येणार आहेत. यामुळे आरोग्य विभागाची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आल्यानंतर प्रशासकीय कामांमध्ये गतिमानता आणि दर्जेदार पायाभूत सुविधा आणि आरोग्य सुविधा देण्यास मदत होणार आहे.

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज या इमारतीमध्ये प्रशिक्षण हॉल, व्हिडिओ कॉन्फरन्स हॉल, अभिलेख कक्ष, वाहनतळ, आदी पायाभूत सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे, या इमारतीचे काम नियोजित वेळेत पूर्ण करावे. आज लोकार्पण करण्यात आलेल्या नवीन आपला दवाखान्यांपैकी पुणे शहरात सात दवाखाने आहेत. या दवाखान्यांच्या माध्यमातून शहरी भागात झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या गरीब नागरिकांना अधिक गतिमान आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, असे मंत्री आबिटकर म्हणाले.

## सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्ली पोलिसांकडून अटक

**दिल्ली, ता. २५ :** नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या आणि सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के सक्सेना यांनी दाखल केलेल्या फौजदारी मानहानी खटल्यात दोषी आढळल्या कारणाने मेधा पाटकर यांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना २००० साली दाखल केलेल्या खटल्याची शिक्षा २०२४ म ध्ये सुनावण्यात आली आहे. सक्सेना यांनी मानहानीच्या खटल्यामध्ये त्यांना दोषी ठरवले होते. न्यायालयाने त्यांना २३ एप्रिल रोजी हजर राहण्यास सांगितले होते. यापूर्वी जुलै २०२४ मध्ये मॅजिस्ट्रेट कोर्टाने त्यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली होती. न्यायालयाने त्यांना व्ही.के सक्सेनाला १० लाख रुपये भरपाई देण्याचे निर्देशही दिले होते. तरी त्यांनी दंडाची रक्कम जमा केली नाही तसेच त्या न्यायालयात



हजरही राहिल्या नव्हत्या. त्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश विशाल सिंह यांनी मेधा पाटकर यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी निजामुद्दीन भागातून त्यांना ताब्यात घेतलं असून साकेत कोर्टमध्ये त्यांना हजर केलं जाणार आहे.

दरम्यान, साकेत कोर्टाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश विशाल सिंह यांनी मेधा पाटकर यांना कोर्टात हजर न राहणे आणि जाणून-बुजून शिक्षेशी निगडित आदेशाचे पालन केल्याचा ठपका ठेवला आहे.

# केंदूरच्या कन्येचा ‘यूपीएससी’ मध्ये डंका; मानसी साकोरे यांनी आयपीएस होऊन मिळवले यश

**योगेश मारणे**

शिरूर, ता. २५ : शिरूरची सुकन्या डॉ. मानसी नानाभाऊ साकोरे यांनी तीन वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची (UPSC) परीक्षा उत्तीर्ण होण्याचा बहुमान मि ळवला आहे. नुकत्याच लागलेल्या ‘यूपीएससी’च्या निकालामध्ये देशात ४५४ व्या रँकने उत्तीर्ण होऊन डॉ.म ानसी ह्या 'आयपीएस' झाल्या आहेत.

‘आयएएस’ होण्याचे स्वप्न हेच अंतिम लक्ष ठेवल्यामुळे डॉ. मानसी यांनी विक्रम प्रस्थापित केला आहे. तीन वेळा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या डॉ.मानसी या संपूर्ण पुणे जिल्ह्यामध्ये बहुधा पहिल्याच महिला अधिकारी आहेत. देशपातळीवर ४५४ वी रँक प्राप्त झाल्यामुळे डॉ.मानसी नानासाहेब साकोरे या भारतीय पोलीस सेवेत (IPS) रुजू होणार आहेत.

शिरूर शहरामधील छत्रपती कॉलनी येथे सेवानिवृत्त सैन्य अभियांत्रिकी अधिकारी नानाभाऊ साकोरे हे पत्नी रंजना, दोन मुली डॉ. दीपिका आणि डॉ.मानसी व मुलगा डॉ.जय असे वास्तव्यास आहेत. विशेष म्हणजे नानाभाऊ साकोरे यांच्या दोन्ही मुली व मुलगा हे तिघेही डॉक्टर आहेत. मोठी मुलगी डॉ. दिपिका या विवाहित असून, नागपूर येथे आरोग्य खात्यात डायरेक्टर आहेत. तर त्यांचे पती कृष्णात पाटील (IRS) हे रेल्वेत वरिष्ठ आधिकारी आहेत, त्याचप्रमाणे नानाभाऊ साकोरे यांचा मुलगा डॉ. जय हे एम.एस.ऑर्थोपेडिक आहेत, डॉ.मानसी यांनी बीडीएसचे शिक्षण पूर्ण करून त्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करत होत्या.

डॉ. मानसी ह्या यापूर्वीच आयपीएस



झाल्या होत्या.परंतू,आयएएस होण्याचे स्वप्न बाळगून असलेल्या डॉ.मानसी यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा अभ्यास पुढे सुरूच ठेवला होता. यूपीएससीमध्ये तिहेरी यश मि ळवलेल्या डॉ. मानसी यांना गतवर्षीच्या यूपीएससी परीक्षेच्या निकालामध्ये ५३१ वी रँक प्राप्त झाली होती. मात्र,नुकत्याच लागलेल्या निकालामध्ये डॉ. मानसी यांना देशात ४५४ वी रँक मिळाली आहे. डॉ.मानसी यांनी पुन्हा तिसऱ्यांदा केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आयपीएस होण्याचा बहुमान मिळवला आहे. डॉ. मानसी या तालुक्याचे ज्येष्ठ नेते स्व.अर्जुनराव शेटे यांची नात आहेत.

डॉ. मानसी साकोरे यांचे प्राथमिक शिक्षण शिरूर नगरपरिषदेच्या मराठी शाळेत झाले. त्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण त्यांनी शिरूर येथीलच विद्याधाम प्रशालेतून पूर्ण केल्यानंतर डॉ.मानसी यांनी बीडीएसला म्हणजे दंत वैद्यक शास्त्रा मध्ये प्रवेश घेऊन पदवी प्राप्त केली. लहानपणापासून कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या डॉ. मानसी यांनी शिष्यवृत्ती परीक्षेतही यश मिळविले होते. त्यामुळे डॉ. मानसी यांनी सुरवातीला तीन महिने यूपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी क्लास लावला त्यानंतर संपूर्ण परीक्षा आणि अभ्यासाची तयारी डॉ.मानसी यांनी घरीच केली व उत्तुंग यश प्राप्त केले.


‘पुणे प्राईम न्यूज’शी डॉ. मानसी यांचे वडील नानाभाऊ साकोरे यांनी बोलताना सांगितले की, मला डॉक्टर होण्याची खूप इच्छा होती परंतू, माझ्या घरच्या जेमतेम परिस्थितीमुळे मला डॉक्टर बनता आले नाही. मात्र,माझे डॉक्टर होण्याचे स्वप्न माझ्या तीनही मुलांनी डॉक्टर होवून साकार केले. माझ्या तीनही मुलांचे भविष्य व करियर घडविण्यात पत्नी रंजना यांचे खूप मोलाचे योगदान आहे. कारण मी सैन्य दलातील नोकरीमुळे कायमच घरापासून दूर होतो.अशा वेळी मुलांना घडविण्याचे व त्यांना चांगले संस्कार देण्याचे काम पत्नी रंजना यांनी केल्याचे नानाभाऊ साकोरे यांनी आवर्जून नम्रतापूर्वक सांगितले.

माझ्या यशात आई रंजना व वडील नानाभाऊ ह्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे डॉ. मानसी यांनी सांगितले. ग्रामीण भागात व मराठी माध्यमामध्ये शिक्षण घेतलेली म ुलेही केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवू शकतात. मोठे स्वप्न पाहण्याची इच्छा व स्वप्न पूर्ण करण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द, चिकाटी व कष्ट घेण्याची तयारी असेल तर कोणालाही यश मिळू शकते, असे डॉ.मानसी यांनी सांगितले. दरम्यान, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या सर्वांनी पुढील आयुष्यासाठी ‘ए’ आणि ‘बी’ असे दोन प्लॅन तयार करून स्पर्धा परीक्षकांची तयारी करावी. कारण कोणत्याही यशाला कधीही शॉर्टकट नसतो. त्यामुळे अभ्यास आणि सातत्य हेच स्पर्धा परीक्षेच्या यशाचे रहस्य आहे. असेही डॉ.मानसी यांनी शेवटी सांगितले.

# अनैतिक संबंधाच्या संशयावरून पतीकडून पत्नीचा खून

## इंदापूर पोलिसांनी पतीसह त्याच्या मित्राला केली अटक

**इंदापूर, ता. २५ :** इंदापूर तालुक्यातील कळाशी येथून तीन महिन्यांपासून बेपत्ता असणाऱ्या २६ वर्षीय विवाहितेचा पती आणि त्याच्या मित्राने खून केल्याचे समोर आले आहे. तिचा मृतदेह ढेकुगाव ते परधाडी (ता. नांदगाव, जि. नाशिक) घाटात टाकल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी इंदापूर पोलीस ठाण्यात दोघाजणांवर गुन्हा दाखल झाला आहे. प्रियंका जोतीराम करे (वय २६, रा. कळाशी, ता. इंदापूर) असे दुर्दैवी विवाहितेचे नाव आहे. जोतीराम आबा करे (वय-३४, रा.कळाशी ता.इंदापूर), दत्तात्रय शिवाजी गोलांडे (रा.गोलांडेवस्ती, इंदापूर) अशी आरोपींची नावे आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, २९ जानेवारी २०२५ रोजी प्रियंका करे ही बेपत्ता झाल्याची तक्रार इंदापूर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या प्रकरणाचा सखोल तपास केल्यानंतर २३ एप्रिल २०२५ रोजी हवालदार सुधीर भीमराव काळे यांनी फिर्याद दिली. प्रियंकाचे लग्न जोतीराम याच्या सोबत झाले होते. जोतीराम हा सतत तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन, तुझे वागणे बरोबर नाही. त्यामुळे आमची नातेवाईक व जनमानसात बदनामी होत आहे, असे म्हणून छळ करायचा.

त्यानंतर जोतीरामने तिचा खून करण्याचे ठरविले. २७ जानेवारी २०२५ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास आरोपी जोतीराम करेने गळा दाबून पत्नी प्रियंकाचा खून केला. यानंतर त्याने त्याचा मित्र दत्तात्रय गोलांडे याला बोलवून घेतले. या दोघांनी तिचे प्रेत चार चाकी वाहनात टाकून २८ जानेवारीच्या पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील ढेकुगाव ते परधाडी घाटात फेकून देऊन पुरावा नष्ट केला, असे फियार्दीत नमूद करण्यात आले आहे.

# यशवंत जमीन विक्री प्रकरणी सभासदांची उच्च न्यायालयात याचिका

## कोर्टाकडून सर्व प्रतिवादींना नोटीस जारी; पुढील सुनावणी २० जूनला होणार

**लोणी काळभोर, ता. २५ :** थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्तावित शंभर एकर जमीन विक्रीच्या निर्णयाविरोधात कारखान्याचे सभासद विकास लवांडे, लोकेश कानकाटे, सागर गोते व राजेंद्र चौधरी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेवर न्यायमूर्ती ए. एस. चांदुरकर व न्यायमूर्ती मिलिंद साठे या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

या सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने यशवंत प्रकरणी सभासद शेतकऱ्यांनी या पूर्वी दाखल व निकाली झालेल्या याचिकांमधील अंतरिम आदेश व



निकाल खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच यशवंत सहकारी साखर कारखाना २०१२-१३ पासून आजपर्यंत बंद आहे. २०१७ मध्ये कारखाना अवसानात काढण्यात आला. त्यानंतर २०२२ मधे अवसायन रद्द झाली. तसेच २०२४ मध्ये संचालक मंडळाची निवडणूक पार पडली.

यासर्वकाळातदरम्यान 'यशवंत'चे नेमकेदेणे व येणे किती आहे? याबद्दल कोणताही ठोस स्वरूपाचा अहवाल व लेखाजोखा उपलब्ध नाही. मुळात संस्थेचे राज्य सहकारी बँकेला किती रक्कम देणे बाकी आहे, यामध्ये तफावत आढळत असल्याने याचा निर्णय होणे गरजेचे आहे. तसेच कारखान्याची संपूर्ण मालमत्ता राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात आहे. सदर कारखाना ताब्यात घेताना कारखान्याची यंत्रे आणि इतर सामग्री यामध्ये आता मोठी तफावत आहे. अनेक मोठी यंत्रे गायब झाल्यामुळे सभासदांचे तब्बल कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे देखील याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. योगेश पांडे यांनी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

तसेच कारखान्याच्या पूर्वीच्या संचालक मंडळांनी केलेल्या आर्थिक अपहार प्रकरणी वर्ष २०१३-१४ पासून तब्बल १४ कोटी रुपये व त्यावरील व्याज त्यांच्याकडून वसुलीसाठी प्रादेशिक साखर संचालकांचे आदेश झाले होते. मात्र, ही रक्कम वसूल करण्यासाठी आजपर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही.

दरम्यान, मागील रक्कम येणे बाकी तसेच साखर विक्रीतून वर्ष २०११-१२ या वर्षामध्ये प्राप्त झालेली रक्कम वीस कोटी रुपये राज्य सहकारी बँकेत जमा करण्यात आली आहे. याचाही हिशोब जुळत नसल्याने सकृतदर्शनी यशवंत सहकारी बँकेला देणेच लागत नाही, असेही न्यायालायच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या सर्व गोष्टींचा विचार करून न्यायालयाने याप्रकरणी संबंधित सर्व प्रतिवादींना नोटीस जारी केली. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी २० जूनला होणार आहे.

# आयपीएल सामन्यावर बेटिंग घेणाऱ्यांवर पोलिसांचा छापा; पाच जणांना अटक

**पुणे, ता. २५ :** आयपीएलच्या सामन्यावर वेगवेगळ्या समाजमाध्यमातून बेटिंग घेणाऱ्या टोळक्यांवर पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुंडा विरोधी पथकाने छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत ५ जणांना अटक केली आहे. तसेच बेटिंग घेण्यासाठी वापरण्यात येणारे १८ मोबाईल, ४ लॅपटॉप असा ५ लाख २० हजार ६१० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

अंकुश यशवंत कुशवाह (वय २९ वर्ष, रा. ब्लुरिजसोसायटी, हिंजवडी), विक्रम ललीत झा (वय २५ वर्ष ), विकास गोविंद पारधी (वय २४ वर्ष), आयुष कुमार झा (वय २६ वर्ष), गौरव शिवराम ठेंगरी (वय २६ वर्ष) प्रेमकुमार ईश्वरदास राजवाणी (वय ५२ वर्ष, रा. जबलपूर, मध्यप्रदेश) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.



तसेच मोहित या साथीदारावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्व जण मध्यप्रदेश, हरियाणा , नागपूर अशा विविध राज्यात, शहरात राहणारे असून ते आयपीएल सामन्यांवर बेटिंग घेण्यासाठी येथे आले होते. मागील १५ दिवसांपासून ते आयपीएलवर बेटिंग घेत आहेत. याप्रकरणी गुंडा विरोधी पथकाचे पोलीस हवालदार गणेश मेदगे यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आयपीएलमध्ये मंगळवारी (२२ एप्रिल) दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होता. तेंव्हा या सामन्यावर बेटिंग घेतले जात असल्याची माहिती गुंडाविरोधी पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी हिंजवडी येथील ब्लु रिज सोसायटीतील फ्लॅटवर रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. छापा टाकला असता फ्लॅटमध्ये ५ जण मोबाईल व लॅपटॉपचा वापर करुन बेटिंग घेताना आढळून आले.


तसेच दुसऱ्याच्या नावावरील सिम कार्ड व बँक खाते वापरुन फसवणूक करण्याच्या उद्देशाने Cricline, Cricket live Line, CricBuzz अशा विविध समाजमाध्यमातील ॲपद्वारे क्रिकेटवर बेटिंग घेताना दिसले. त्यांच्याकडून ४ लॅपटॉप व १८ मोबाईल असा एकूण ५ लाख २० हजार ६१० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ पांचाळ तपास करीत आहेत.

# पुरंदर विमानतळासाठी भुसंपादनाच्या हालचालींना वेग; जिल्हा प्रशासनाकडून तीन उपजिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**बापू मुळीक**

सासवड, ता. २५ : पुरंदर तालुक्यामध्ये प्रस्तावित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादनाच्या हालचालींना वेग आला आहे. भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाने तीन अधिकाऱ्यांची नुकतीच नियुक्ती केली आहे. काही दिवसांमध्ये या भूसंपादन अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६२ च्या कलम ३२ (२ )ची अधिसूचना जारी केली जाणार आहे.

या अधिसूचनेनंतर विमानतळासाठी जागा निश्चित केलेल्या वनपुरी, उदाची वाडी, कुंभारवळण, एखतपुर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावातील सातबारा उताऱ्यावर भूसंपादनाचे शेरे यांची नोंद घालण्यात येणार आहे. पर्यायाने या सात गावातील जमीन खरेदी विक्रीवर बंदी येणार आहे.



भूसंपादनासाठी तीन उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर, या अधिकाऱ्यांकडून भूसंपादनाची ३२ (२) ची अधिसूचना जारी होणार आहे. अशी माहिती जिल्हा प्रशासकडून देण्यात आली आहे.

या अधिसूचनेनुसार जमीन मालकांना भूसंपादनाची नोटिस बजावण्यात येणार आहे. तसेच विमानतळाबाबत काही हरकती असतील तर आपले म्हणणे, मांडण्याची संधी दिली जाणार आहे. तसेच या अधिसूचनेनुसार भूसंपादन अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर जाण्याचा व पाहणी करण्याचा अधिकार प्राप्त होणार आहे.

पारगाव या ठिकाणचे सर्वाधिक क्षेत्र संपादित होणार या विमानतळासाठी सात गावांपैकी सर्वाधिक क्षेत्र हे पारगाव या ठिकाणचे संपादित होणार आहे. या गावातील १५४२ सर्वे नंबर मधील ९७२ हेक्टर जागा संपादित होणार आहे. त्यानंतर खानवडी गावातील ३८१ सर्वे नंबर मधील ४५१ हेक्टर जागा, कुंभार वळण मधील ४२४ सर्वे नंबर मधील बाधित होत असून, या गावातील ३४१ हेक्टर क्षेत्राचे संपादन होणार आहे.

दरम्यान, वनपुरी गावातील ३६२ सर्वे नंबर बाधित होत असून, त्यातील ३३० हेक्टर जमीन, उदाची वाडी मधील १९९ सर्वे नंबर मधील २४० हेक्टर जमीन, एखतपूर मधील १४५ सर्वे नंबर बाधित होत असून, त्यातील २१४ हेक्टर जमिन आणि मुंजवडी मधील २२१ सर्वे नंबर मधील १२२ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे.





## संक्षिप्त

### वैज्ञानिकाकडून ५० वर्षीय महिलेवर अत्याचार



**पुणे, ता. २५ :** वाकड परिसरात एका वैज्ञानिकांकडून ५० वर्षीय महिलेवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला पुण्यातील वाकड परिसरात एकट्याच राहतात. त्यांची आई आणि मुलगा अधून मधून त्यांच्या घरी ये-जा करत असतो. जानेवारी २०२३ मध्ये फिर्यादी यांच्या नातेवाईक मुंबईच्या मुलुंड येथील एका रुग्णालयात कर्करोगाचे उपचार घेत होत्या. त्यावेळी फिर्यादी त्यांच्यासोबत रुग्णालयात राहत होत्या. तेव्हा तिथे आरोपी व्यासही उपचार घेत होता. दरम्यान, फिर्यादी आणि आरोपीची ओळख झाली होती. त्याने तिच्याशी जवळीक वाढवण्याचा प्रयत्न केला. माझं तुझ्यावर प्रेम आहे, असं सांगत आरोपीनं वारंवार तिच्यावर अत्याचार केला. नराधम आरोपी एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने पीडितेला व्यवसायात भागीदारी देतो म्हणत कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. यानंतर आरोपीने पीडितेला बेदम मारहाण देखील केली आहे. दरम्यान, याप्रकरणी पीडित महिलेने वाकड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निशांत जगदीश व्यास असं गुन्हा दाखल झालेल्या ३७ वर्षीय आरोपीचं नाव आहे. या घटनेने पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



### शिक्षण, संशोधन व नवोपक्रमांसाठी महासार्कची स्थापना

**मुंबई, ता. २५ :** राज्यातील उच्च शिक्षण आणि संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक सुलभतेने शिक्षण मिळावे तसेच त्यांना उद्योगआधारित शिक्षणाची सांगड घालता यावी, यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद अर्थात महासार्कची स्थापना केली आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला अहवाल दिला असून या अहवालातील शिफारशींनुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींची राज्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने उच्च शिक्षण, संशोधन व नवोपक्रम या क्षेत्रातील उत्कृष्टता अधिक बळकट करण्यासाठी व त्यास पुढे नेण्यासाठी राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील संकल्पना, विचारसरणी, चिंतनप्रक्रिया आणि तर्कशास्त्र यांची व्यापक स्वरूपात देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी व मार्गदर्शक सूचना तयार करण्यासाठी राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद अर्थात महासार्कची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# सर्वांगीण निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध : अजित पवार

**पुणे, ता. २५ :** निरोगी नागरिक हाच राज्याच्या प्रगतीचा पाया असून, आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासोबतच सर्वांगीण निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असून याकरीता सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.



कुटुंब कल्याण भवन येथे आयोजित राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्र इमारत भूमिपूजन आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत राज्यातील नवीन आपला दवाखान्यांच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याचे आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे व्यवस्थापकीय संचालक अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी आदी उपस्थित होते.

राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्र इमारत आणि नवीन ४३ आपला दवाखान्यांच्या माध्यमातून नव्याने भर पडणाऱ्या आरोग्य सुविधांमुळे राज्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट, सक्षम आणि गतिमान होईल, असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्यामुळे एका गरोदर महिलेला जीव गमवावा लागल्याच्या प्रकरणात चौकशी होऊन दोषींवर निश्चित कठोर कारवाई केली जाईल. अशा घटना पुन्हा घडू नये, अशी प्रणाली आणि कठोर नियम सर्व रुग्णालयांना लागू करण्यासाठी राज्य शासन एक नवे धोरण लवकरच राज्यात लागू करणार आहे. या धोरणानुसार कोणतेही रुग्णालय नागरिकाला अत्यावश्यक आरोग्य सेवेपासून वंचित ठेवणार नाही. गरजू नागरिकांना वैद्यकीय मदत मिळालीच पाहिजे, अशी राज्य शासनाची भूमिका असून लवकरच राज्यात रुग्णालयांसाठी नो डिनायल पॉलिसी लागू करणार आहे. राज्य शासन रुग्णालयांना जागेसह सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देते.

जागतिक हिवताप दिनानिमित्त चांगले काम करण्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, अधिकारी, कर्मचाऱ्यासह नागरिकांनी नियमित व्यायाम केला पाहिजे. संतुलित आहार घेतला पाहिजे. आपले मानसिक आरोग्य चांगले राखून निरोगी नागरिक हाच राज्याच्या प्रगतीचा पाया आहे या विचाराने सर्वांनी काम करावे, नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा दिली पाहिजे, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.



### व्यायामशाळा विकास अनुदान मर्यादा ७ लाखांवरून १४ लाख रुपये

**मुंबई, ता. २५ :** राज्याचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील व्यायामशाळेच्या सुविधा अधिक बळकट करण्यासाठी व्यायामशाळा विकास अनुदान ७ लाखांवरून वाढ करून थेट १४ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती, राज्याचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. ग्रामीण व शहरी भागातील व्यायाम शाळा बांधण्यासाठी अनुदान मर्यादा ही २०१४ मध्ये २ लाखांवरून ७ लाख रुपये करण्यात आली होती. त्यानंतर बांधकाम खर्चामध्ये झालेली वाढ लक्षात घेता ही मर्यादा १४ लाखांपर्यंत वाढविण्यात आली असल्याचा शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे.

## पुरंदरमध्ये दहा टँकरद्वारे अकरा गावांना पाणीपुरवठा सुरू

बापू मुळीक

पुरंदर, ता. २५ : पुरंदर तालुक्यात दुष्काळाच्या छाया गंभीर बनत चालल्या आहेत. त्यातच पाण्याचा प्रश्न तर ग्रामीण भागात चांगलाच भेडसावत आहे. ग्रामीण भागात सध्या तरी १० टँकरद्वारे ११ गावांना पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये पिसे, सोनोरी, झेंडेवाडी, वाल्हे, नायगाव, पूर पोखर, वागदरवाडी, राजुरी, सिंगापूर, पोंढे, साकुर्डे या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर गुरोळी, एखतपुर, निळूज,




भिवडी, नायगाव, दौंडज, वाळुंज, खानवडी या गावांचे टँकर मागणीचे प्रस्ताव हे प्रशासनाकडे प्राप्त झाले आहेत. ते मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

दिवे प्रादेशिक योजनेची पाईपलाईन फुटल्यामुळे, योजना बंद असून, दिवे, (वाड्यावस्त्यात्यावर) सोनोरी, वनपुरी, उदाची वाडीं गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यामुळेच अनेक गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. त्यामुळे टँकरची मागणी ही वाढत चालली आहे. त्यासाठी प्रस्ताव आले की, लगेच सुविधा या दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये शासनाकडे पाठवले जाणार आहेत. पाण्याचा प्रश्न त्वरित सोडवला जाणार आहे. पुरंदर पंचायत समितीचे पाणीपुरवठा उप अभियंता सचिन घुबे यांनी सांगीतले.

## शरद पवार गटाच्या प्रवक्ते पदावरील सर्व नियुक्त्या तडकाफडकी रद्द

**पुणे, ता. २५ :** गेल्या काही दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात नाराजीचे वातावरण असल्याच्या चर्चा सातत्याने सुरू आहेत. अशातच आता पक्षांतर्गत असणारा वाद चव्हाट्यावर आला असून पक्षाचे सर्वच प्रवक्ते आणि पदाधिकारी यांच्यावरील नियुक्त्या तातडीने रद्द करण्यात आल्या आहेत. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या निर्देशानुसार सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या अचानक रद्द करण्यात आल्या आहेत. त्यांच्या या निर्णयामागे पक्षातील एका वादग्रस्त विषयावरून निर्माण झालेली अंतर्गत कुरघोडी असल्याच समजतं. याचं कारण म्हणजे १६ एप्रिल रोजी झालेल्या पक्षाच्या बैठकीत पानिपत येथे सरकारकडून बनवण्यात येणाऱ्या स्मारकाला विरोध करण्याची भूमिका जितेंद्र आव्हाड यांनी मांडली, याला मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी कडाडून विरोध केला. बैठकीत वरिष्ठ नेत्यांच्या भूमिकेला केलेला विरोध पाहता महेश तपासे यांची मुख्य प्रवक्ता पदावरून उचलबांगडी करण्यासाठी सर्वच प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात नाराजीच वातावरण असून पक्षाच्या अंतर्गत मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत.




Janardan Govardhan Dandge Publisher Janardan Govardhan Dandge Printer Janardan Govardhan Dandge Printed at Jay Ganesh offset, 20/1d/la, Somwar Peth, opp. Bidker Associaties, behind Maharaja Lodge, Pune -411011 (Maharashtra) Publish at- Balaji Tower, House No. B 101, Pune-Solapur Road. Kavadipat Toll Naka, Tal.: Haveli Dist. : Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मालक जनार्दन गोवर्धन दांडगे, पब्लिशर जनार्दन गोवर्धन दांडगे प्रिंटर जनार्दन गोवर्धन दांडगे इन्होंने जय गणेश ऑफसेट २०/ १डी /१९. सोमवारपेठ, बिडकर असोसिएटस केसामने, महाराजा लॉज केपास, पुणे. ४११०११ (महाराष्ट्र) मे छपवाकर बालाजी टॉवर हाऊस नंबर बी १०१, पुणे-सोलापुर रोड, कवडीपाट टोलनाका, ता. हवेली जि. पुणे-४१२२०१ (महाराष्ट्र) प्रकाशित किया. संपादक जनार्दन गोवार्धन दांडगे

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जूनपासून; पहिलीत नवा अभ्यासक्रम, शिक्षणाच्या पद्धतीत बदल



**मुंबई, ता. २५ :** महाराष्ट्र सरकारने जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून शाळांमध्ये नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. या नवीन धोरणामुळे राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडून येतील. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये अभ्यासक्रमाची चार स्तरांमध्ये विभाजन करणारी एक नवीन अभ्यासक्रम रचना करण्यात आली असून जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. हा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जाहीर केला असून, शिक्षणाच्या पद्धतीत आणि रचनेत मोठा बदल अपेक्षित आहे.

अभ्यासक्रमाची चार स्तरांमध्ये विभाजन करणारी एक नवीन अभ्यासक्रम रचना आखण्यात आली असून यात पायाभूत, पूर्वतयारी, पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक हे टप्पे वयोगटानुसार ठरवले गेले आहेत. प्रत्येक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

शाळेच्या वेळापत्रकात, विषय नियोजन, मूल्यांकन पद्धती आणि परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहे. राज्य सरकारने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य केली आहे, हा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे नियोजनच्या मार्गदर्शनाखाली केले जाईल आणि शाळांना हे नियोजन जूनपूर्वी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

दरम्यान, एनसीईआरटी मॉडेलचे अनुसरण करून नवीन अभ्यासक्रम चौकट विकसित करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शाळांना आवश्यक मार्गदर्शन आणि नियोजन कागदपत्रे प्रदान केली जातील. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीचा उद्देश राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत एक महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आणणे आहे, ज्यामध्ये समग्र विकास आणि कौशल्य निर्मितीवर लक्ष केंद्रित केले जाईल.

- मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी पहिलीच्या वर्गापासून हिंदी भाषा शिकणे अनिवार्य
- इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम जून २०२५ मध्ये लागू करण्यात येणार
- दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचे नवे अभ्यासक्रम २०२६-२७ मध्ये लागू करण्यात येणार
- पाचवी, सातवी, नववी आणि अकरावीतील नवे अभ्यासक्रम २०२७-२८ मध्ये मध्ये लागू करण्यात येणार
- २०२८-२९ मध्ये आठवी, दहावी आणि बारावीचे अभ्यासक्रम नव्याने तयार केले जाणार आहे.
- नवीन शिक्षणपद्धतीत एनसीईआरटीच्या धर्तीवर समग्र, मूल्य-आधारित आणि कौशल्य-आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

# दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये अडकलेले ५०० पर्यटक राज्यात दाखल



**मुंबई, ता. २५ :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिल्यानंतर विविध प्रयत्नांतून गेल्या २ दिवसात आतापर्यंत सुमारे ५०० पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने इंडिगो आणि एअर इंडियाच्या दोन विशेष विमानाची व्यवस्था पर्यटकांसाठी केली होती, त्यातून १८४ पर्यटक मुंबईत दाखल झाले आहेत. दरम्यान, आणखी २३२ प्रवाशांसाठी आज (दि. ) एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकार करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेनंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांना तातडीने काश्मिरला जाण्यास सांगितले होते. गिरीश महाजन यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज एकूणच स्थितीचा आढावा घेतला. उद्यासाठी आणखी विमाने करायची असतील, तर करा, त्याचा खर्च राज्य सरकार देईल, असे त्यांनी सांगितले. गिरीश महाजन यांनी लष्कराच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांची भेट घेतली, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हीडिओ कॉलवर त्या पर्यटकांशी संवाद साधला आणि उपचार करणाऱ्या तेथील डॉक्टरांचे आभारही मानले.

काश्मिरातील महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केले जात आहे. काही पर्यटकांची कालिका धाम, जम्मू येथे राहण्याची व्यवस्था केली गेली. अमरावती येथील सुमारे १४ पर्यटक येथे थांबले होते. काही पर्यटक मिळेल त्या व्यवस्थेने जम्मूवरुन दिल्लीकडे रवाना झाले असून, त्यांची दिल्ली येथे व्यवस्था करण्यात येत आहे. उद्या काश्मिरातून येणाऱ्या विशेष विमानात अकोला, अमरावती येथील पर्यटक असणार आहेत. दिल्लीत महाराष्ट्र सदनात प्रवाशांच्या याद्या सातत्याने तयार केल्या जात असून, गरज पडली तर परवाही विशेष विमान करण्याची तयारी राज्य सरकारतर्फेकरण्यात येत आहे.

# इनामगाव येथे बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू



**शिरूर, ता. २५ :** गेल्या काही वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील अनेक गावात बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात वावर दिसून आलेला आहे. अशातच आता पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील इनाम गाव परिसरात बिबट्याने एका ९५ वर्षीय वृद्ध महिलेवर हल्ला केला आहे. साखर झोपेत असताना अचानक दबक्या पावलांनी बिबट्या आला आणि त्या वृद्ध महिलेला फरपटत घेऊन गेला. यातच त्या वृद्ध महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मीबाई भोईटे असे मृत महिलेचे नाव आहे. वाढत्या उन्हाच्या तडाक्यामुळे त्या घरा समोरच्या ओट्यावर झोपलेल्या असताना पहाटेच्या सुमारास बिबट्याने त्यांना ओट्यावरून फडपटत नेत उसाच्या शेतात ठार केलं. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सकाळी उशिरापर्यंत त्या दिसल्या नाहीत म्हणून कुटुंबीयानी आणि गावकऱ्यांनी त्यांचा शोध सुरू केला. या शोधादरम्यान उसाच्या शेतात त्यांचा मृतदेह आढळून आला.यावर बिबट्यांच्या हल्ल्याच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या.

दरम्यान, या घटनेनंतर इनामगाव आणि आसपासच्या परिसरातील नागरिक बिबट्याच्या हल्ल्यामुळे भयभीत झाले असून संतप्त गावकऱ्यांनी तातडीने बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी वनविभागाकडे केली आहे.

# यशदा कार्यक्रमास ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट

**राहुलकुमार अवचट**




यवत, ता. २५ : राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त ग्रामविकास तथा पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी यशदा येथे आयोजित कार्यक्रमास भेट दिली. भारतीय संविधानातील ७३ व्या घटना दुरुस्तीचे स्मरण म्हणून हा दिवस साजरा करण्यात येत असून या घटना दुरुस्तीमुळे ग्रामविकासाला नवी दिशा व ग्रामीण विकासाला चालना मिळाली असल्याचे मंत्री जयकुमार गोरे म्हणाले.

यावेळी प्रथम स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन मंत्री जयकुमार गोरे यांनी आदरांजली वाहिली. येत्या २६ व २७ एप्रिल रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या तयारीची पाहणी केली. तसेच राष्ट्रीय पंचायत दिनानिमित्त शुभेच्छा देऊन मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, यशदा ही देशाला दिशा देणारी संस्था आहे. या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले अधिकारी सर्वोच्च पदावर काम करत आहेत. शासन विविध योजनांद्वारे ग्रामविकासाला चालना देत असून ग्रामविकास विभागाकडून समृद्ध ग्राम योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेची संकल्पपूर्ती अंतिम टप्प्यात आहे.

यावेळी यशदाचे महासंचालक निरंजन सुधांशू, उपमहासंचालक पवनीत कौर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राज्य ग्रामीण विकास संस्थेचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पंचायत राज संचालक गिरीश भालेराव उपस्थित होते.

# आठवीतल्या विद्यार्थ्याला रिंगण करुन मारहाण

## जामखेड येथील धक्कादायक व्हिडीओ व्हायरल



**अहिल्यानगर, ता. २५ :** अहिल्यानगरच्या जामखेड येथील निवासी वस्तीगृहातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वस्तीगृहातील नववीच्या मुलांनी आठवीतील विद्यार्थ्याला बेल्टने बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील आरोळे वस्ती येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर निवासी वस्तीगृहात इयत्ता आठवीच्या मुलांना नववीच्या मुलांनी मारहाण केली आहे. याप्रकरणी शाळा प्रशासनाने जाम खेड पोलिसांना माहिती दिल्यानंतर तातडीनं या घटनेची नोंद घेण्यात आली आहे. मारहाण झालेले विद्यार्थी आणि मारहाण करणारे विद्यार्थी अल्पवयीन असल्याने बाल न्याय मंडळामार्फत पुढील कारवाई केली जाणार आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

दरम्यान आठवीतील विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्या अल्पवयीन मुलांचा सामाजिक पार्श्वभूमीचा अहवाल हा बाल न्यायमंडळाकडे सादर केला जाणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी दिली आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना समुपदेशनाची गरज असल्याचंही बोललं जात आहे. मात्र नेमकी मारहाण कोणत्या कारणामुळे झाली याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसे जप्त; वानवडी पोलिसांची कारवाई




**पुणे, ता. २५ :** वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेकॉर्डवर असलेल्या एका सराईत गुन्हेगाराला वानवडी पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून १ लाख १ हजार ८०० रुपये किंमतीचे गावठी बनावटीचे पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे, एक ॲक्टिव्हा दुचाकी व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

ओंकार ऊर्फ बद्या प्रकाश बधे (वय-२६), रा. डॉ. राम मनोहर लोहियानगर वसाहत, हडपसर अये अटक करण्यात आलेल्या आरोपीचीं नाव आहेत . गुरुवारी (ता. २४) वानवडी पोलिसांच्या तपास पथकाने हि कारवाई केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी वानवडी पोलिसांचे तपास पथक हद्दीत गस्त घालीत असताना तपास पथकाचे पोलीस अंमलदार यतीन भोसले व गोपाळ मदने यांना बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार ओंकार बधे हा मोठ्या कॅनालच्या लगत काहीतरी संशयित चिजवस्तु जवळ बाळगुन वावरत असुन संशयित चिजवस्तु हि अग्निशस्त्र असण्याची दाट शक्यता असल्याची माहिती मिळाली होती.

सदरची माहिती वरिष्ठांना कळवून सदर ठिकाणी छापा टाकला असता एक इसम संशयितरित्या त्याचेकडील दुचाकीवर बसलेला दिसला. लीसांची चाहुल लागताच तो त्याचेकडी दुचाकी चालु करुन पळु लागला. यावेळी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याला त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव ओंकार ऊर्फ बद्या प्रकाश बधे सांगितले.

दरम्यान, त्याच्या अंगाची झडती घेतली असता देशी बनावटीचे पिस्टल, २ जिवंत काडतुसे, एक दुचाकी व रोख रक्कम मिळून आली. प्राथमिक चौकशीत, त्याने हे शस्त्र स्वतःची दहशत निर्माण करण्याच्या तसेच दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा (गु.र.नं. १७६/२०२५ दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपीवर यापूर्वी देखील मारामारी, दंगल व आर्म ॲक्टसारखे गुन्हे हडपसर पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सदर गुन्हयाचा अधिक तपास हे पोलीस उपनिरिक्षक धनाजी टोणे हे स्वतः करीत आहेत.

ही कारवाई पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहआयुक्त धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यजित आदमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनाजी टोणे व त्यांच्या पथकाने केली. विशेष पथकात पोलीस अंमलदार दया शेगर, महेश गाढवे, अतुल गायकवाड, अमोल पिलाणे, गोपाळ मदने, यतीन भोसले, विष्णु सुतार, अभिजित चव्हाण, बालाजी वाघमारे आणि सोमनाथ कांबळे या विशेष पथकाने केली आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

पुणे, ता. २५ : पुण्यातील खेड तालुक्यातील मांजरेवाडी या गावात धक्कादायक घटना घडली आहे. येथे १२ वी मध्ये शिकणाऱ्या एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. नराधमाने अल्पवयीन मुलीला शेतात नेत तिच्यावरती दोन वेळा लैंगिक अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पीडित मुलीच्या कुटुंबीयांशी संवाद साधला.

या घटनेबाबत माहिती देताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, खेड तालुक्यातील घटनेसारख्या घटना घडू नयेत म्हणून सोमवार पासून शाळेतील मुलीसोबत संभाषण करण्याच्या सूचना बिट मार्शल दामिनी पथकाला दिल्याची माहिती दिली आहे. खेड तालुक्यात घडलेल्या घटनेशी संबंधित आरोपीला अटक केली आहे.

## प्राईम लाईफ

# ‘मदर्स डे’निमित्त सर्वोत्तम भेट देण्याच्या विचारात आहात?

मदर्स डे अर्थात मातृदिन हा आपल्या आईप्रति प्रेम व्यक्त करण्याचा दिवस. दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी हा दिवस ११ मे ला साजरा केला जाणार आहे. ‘मदर्स डे’ला तुम्ही तुमच्या आईला अशी भेट देऊ शकता जी तिच्या चेहऱ्यावर आनंद आणेल आणि तिचे मन आनंदी करेल.

मध्यमवर्गीय कुटुंबात, पालकांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्याची संधी क्वचितच मिळते. कधीकधी कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्याला आपल्या इच्छा दाबाव्या लागतात. तर कधीकधी मुलांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी. काही माता अशाही आहेत त्यांना स्वतःसाठी साडीही खरेदी करता येऊ शकत नाही. अशा परिस्थितीत, तुम्ही तुमच्या आईला तिच्या आवडीचा कोणताही ड्रेस किंवा साडी घेऊन देऊ शकता. तसेच आपण अनेकदा आपल्या जवळच्या लोकांसमोर आपले मन मोकळे करण्यात किंवा आपल्या भावना व्यक्त करण्यात कमी पडतो.

आपण आपल्या आईवर किती प्रेम करतो हे कधीच त्यांना कळू देत नाही. पण, ‘मदर्स डे’ म्हणजे तुमच्या भावना व्यक्त करण्याची एक उत्तम संधी होय. यावेळी तुम्ही तुमच्या आईसाठी एक प्रेमळ पत्र किंवा कविता देखील लिहू शकता. तुमच्या आईला स्वयंपाकाची आवड असेल, तिला स्पा घेणे किंव्रा ब्युटी ट्रीटमेंट घेणे आवडते, तर तुम्ही तिला या संबंधित भेटवस्तू देऊ शकता. तुमच्याकडून भेटवस्तू मिळाल्याने आनंदी होईल आणि त्याची इच्छाही पूर्ण होईल.

# शेअर बाजारात चढउतार कायम; ७ दिवसांच्या तेजीला ब्रेक



मुंबई : गेल्या काही दिवसांपासून शेअर मार्केटमध्ये सातत्याने चढउतार पाहिला मिळत आहे. शेअर बाजारातील सात दिवसांचा तेजीचा कल गुरुवारी संपला. सेन्सेक्स ३०० पेक्षा जास्त अंकांनी घसरून बंद झाला. त्यात हिंदुस्तान युनिलिव्हरचे शेअर्स ४ टक्क्यांनी घसरले तर भारती एअरटेलचे शेअर्स २ टक्क्यांनी घसरल्याचे पाहिला मिळाले.

बीएसई सेन्सेक्स ३१५.०६ अंकांनी घसरून ७९८०१.४३ अंकांवर बंद झाला. नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी ५० निर्देशांकही ८२.२५ अंकांनी घसरून २४२४६ अंकांवर आला. एफएमसीजी क्षेत्रातील दिग्गज हिंदुस्तान युनिलिव्हरने गुरुवारी त्यांचे चौथ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत कंपनीचा नफा ३.७% वाढून २४९४ कोटी रुपये झाला. तसेच, कंपनीच्या महसुलात दोन टक्क्यांनी वाढ झाली आहे.

गुरुवारी, शेअर मार्केट सुरु होताच बीएसई सेन्सेक्स २०० अंकांनी घसरला, तर निफ्टी २४३०० अंकांच्या खाली आला. टाटा कंझ्युमर आणि इटरनल दोन टक्के घसरले. सेन्सेक्समधील ३० पैकी १७ शेअर्स घसरणीसह उघडल्याचे पाहिला मिळाले.

# नाशिकच्या ESIC रुग्णालयात नोकरीची संधी




पुणे : नाशिकच्या महाराष्ट्र कर्मचारी राज्य विमा सोसायटी रुग्णालय येथे नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. जर तुमच्याकडेही आवश्यक पात्रता असेल तर तुम्हाला याठिकाणी नोकरीची संधी मिळू शकणार आहे. यामध्ये रिक्त पदांवर भरती केली जात आहे. संबंधित उमेदवाराची निवड ही प्रत्यक्ष मुलाखतीच्या माध्यमातून केली जाणार आहे. यासाठी २ मे, २०२५ रोजी मुलाखत द्यावी लागणार आहे.

जर तुम्ही चांगल्या नोकरीच्या शोधात असाल तर तुमच्यासाठी ही अत्यंत आनंदाची बातमी असणार आहे. यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना ऑफलाईन माध्यमातून अर्ज करता येणार आहे. पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. महाराष्ट्र कर्मचारी राज्य विमा सोसायटी रुग्णालय, नाशिक येथे डेंटल सर्जन या पदावर भरती केली जात आहे. यामध्ये निवड झालेल्या उमेदवाराला नाशिक येथे जाऊन नोकरी करावी लागणार आहे. या प्रक्रियेंतर्गत काही रिक्त पदे भरली जाणार आहेत.

अशी असेल भरती प्रक्रिया...

- पदाचे नाव : डेंटल सर्जन.
- नोकरीचे ठिकाण : नाशिक.
- वेतन / मानधन : दरमहा ७५००० रुपये
- अर्ज करण्याची पद्धत : ऑफलाईन.
- निवड प्रक्रिया : मुलाखत.
- मुलाखतीची तारीख : २ मे, २०२५
- मुलाखतीचा पत्ता : वैद्यकीय अधीक्षक, महाराष्ट्र कर्मचारी राज्य विमा सोसायटी रुग्णालय, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक ४२२००७.
- या भरती प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी https://www.esic.nic.in/ या अधिकृत वेबसाईटवरून माहिती घेता येणार आहे.

# आता तुम्ही बोलूनही YouTube वर करू शकता कमेंट

नवी दिल्ली : सध्या युट्यूबचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. कोणताही व्हिडिओ, शॉर्ट्स पाहायचे असल्यास युट्यूबला प्राधान्य दिलं जातं. त्यात आता लवकरच युट्यूबवर आवाजात कमेंट करण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. लोक त्यांचा मूड व्यक्त करू शकतील आणि त्या आधारे त्यांना गाणी ऐकायला मिळू शकणार आहे.

YouTube ने काही आकडेवारी शेअर केली आहे. YouTube वर दररोज दोन कोटी व्हिडिओ अपलोड केले जातात, असा दावा केला जातो. यावर्षी YouTube वर अनेक नवीन फीचर्स येणार आहेत. यामध्ये व्हॉईस रिप्लाय खास असा असणार आहे. गेल्या वर्षी, हे फीचर निवडक प्रोड्यूसरसह टेस्ट घेण्यात आली. यावर्षी आणखी अनेक प्रोड्यूसरना हे फीचर मिळेल. कमेंट सेक्शनमध्ये व्हॉईस रिप्लाय देता येतील. sk Music Feature लाँच करण्याची तयारी सुरु आहे.

याअंतर्गत, YouTube प्रीमियम आणि म्युझिक युजर्स त्यांच्या मूडबद्दल सांगू शकतील आणि त्यावर आधारित संगीत ऐकूशकतील. सुरुवातीला हे फीचर इंग्रजीमध्ये असेल. याशिवाय, टीव्हीवर YouTube पाहणाऱ्या युजर्सना लवकरच मल्टीव्ह्यूची सुविधा मिळेल. ते त्याच्या टीव्ही स्क्रीनवर एकाच वेळी वेगवेगळे कंटेंट पाहू शकेल.